II अंतरी पेटवू ज्ञानज्योत II
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
**Kavayitri Bahinabai Chaudhri North Maharashtra University, Jalgaon**
**भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र**




जा.क्र.कबचौउमवि/२९/भा.अ.प्र./ ११० /२०२५ दिनांक :- १०/ १०/२०२५

# दरपत्रक सूचना

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र येथे PM USHA Soft Compontent अंतर्गत एक दिवसीय **राष्ट्रीय चर्चासत्राचे (National Conference- Humanism in Literature, साहित्यातील मानवतावाद, साहित्य मे मानवतावाद )**आयोजन दि. ०९ जानेवारी, २०२६ रोजी करण्यात आले आहे. त्या निमित्ताने प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी यांच्या कडून संशोधनपर लेख मागविण्यात येत आहेत. त्या लेखांचे पुस्तक छपाई करून राष्ट्रीय चर्चा सत्राच्यावेळी प्रकाशित करण्यात येणार आहेत. सदर पुस्तकांच्या छपाई कामाकरिता पंजीकृत ठेकेदारांकडून सिलबंदरित्या दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पुस्तक छपाईचा तपशील | नग संख्या | दर प्रति नग (GSTसह) | एकूण रक्कम (GSTसह) |
|---|---|---|---|---|
| १ | **एक चर्चासत्र (Humanism in Literature, साहित्यातील मानवतावाद, साहित्य मे मानवतावाद) यासाठी येणा-या वरील विषयाच्या संशोधन पेपर यांचे स्वतंत्र ०३ पुस्तके तयार करणे**<br>१) पृष्ठ संख्या विविध विषयनिहाय साधारणत: १५० ते ३०० पाने असतील.<br>२) पुस्तक छपाई ७० जीएसएम पेपर असावी.<br>३) मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ चार रंगात छपाई करावी<br>४) पुस्तक बांधणी पेपर बॅक बाईंडींग असावी<br>५) पुस्तकाची साईज १/८ असावी. | इंग्रजी प्रती ८० नग<br>मराठी प्रती ७० नग<br>हिंदी प्रति ७० नग | | |

**दरपत्रके सादर करण्यासाठी आवश्यक असलेल्या अटी व शर्तींची माहिती खालीलप्रमाणे.** :-

सदर दरपत्रक सुचनेत सहभाग घेण्यासाठी अधिकृत नोंदणी असलेल्या पुरवठादाराची दरपत्रके स्विकारली जातील. त्यासाठी दरपत्रका सोबत शॉप ॲक्ट रजिष्ट्रेशनची/संस्थेची नोंदणी दाखल्याची सत्यप्रत जोडणी आवश्यक आहे.

1) वरील प्रमाणे पुस्तक छपाई करण्याकरीता छपाईचे संशोधन पेपर, मराठी, हिंदी भाषेकरीता युनिकोड फॉन्टमध्ये वर्ड फाईल व इंग्रजीसाठी Times New Roman या फॉन्ट मध्ये आपणास दिल्या जातील.

..२..

२) उपरोक्त पुस्तक छपाईचे कामकाज आवश्यक त्या दुरुतींसह पुस्तकांचा अंतीम ड्राफट आपण दिनांक ३० नोव्हेंबर, २०२५ पर्यंत प्रशाळेस पाठवावा.

३) वरील प्रमाणे विद्यापीठास पुरवठा करण्यात येणा-या पुस्तकाच्या इंग्रजी-८० प्रती, मराठी-७० प्रती व हिंदी-७० प्रती व्यतिरिक्त आपण आपल्या स्तरावर मागणीनुसार पुस्तकांची विक्री करु शकता.

४) पुरवठादाराने PAN CARD ची सत्यप्रत जोडणी आवश्यक आहे.

५) पुरवठादाराने GST Certificateची सत्यप्रत जोडणी आवश्यक आहे.

६) दरपत्रकात नमुद करावयाचे दर हे सर्व करांसह (GST सह) नमुद करण्यात यावेत.त्यासाठी स्वतंत्रपणे सिलबंद पाकीटात लेटरहेडवर सही, शिक्क्यानिशी दर नमुद करून सादर करावेत.

७) सशर्थ दरपत्रकांचा स्विकार केला जाणार नाही.

८) सदरचे पुस्तकांचे संच आपण स्वखर्चाने विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र येथे पोहोच करावे लागेल.

९) कोणतेही कारण न देता दरपत्रके स्विकारण्याचा, फेटाळण्याचा, वरील अटीत संपुर्ण किंवा अंशत: बदल करण्याचा संपुर्ण अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवलेला आहे.

१०) सिलबंद पाकीटावर' **पुस्तक छपाईचे दरपत्रक** असा स्पष्ट उल्लेख असावा.

११) सदरची सिलबंद दरपत्रके भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र येथे **दि. 30 ऑक्टोबर,2025** किंवा तत्पुर्वी सादर करण्यात यावेत

10/10/2025

**संचालक,**
**भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्र**
कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

प्रति,

--------------------------------

--------------------------------

--------------------------------